# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

कार्या.दुरध्वनी क्र.२६४७४४३५ Email : chairman-msbve@nic.in /msbve२००३@yahoo.com Web site :- www.msbve.gov.in


जा.क्र.मराव्यशिपमं/का-१२/ 1009 /२०१५

दिनांक :- 3 JUN 2015

प्रति,

मा.सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

विषय :- म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळातील अभ्यासक्रमांसाठी मुळ लिव्हिंग सर्टिफिकेट (LC) व मुळ मार्कशिट (Marksheet) घेऊन प्रवेश (Admission) घेणेबाबत.

महोदय,

मंडळामार्फत ६ महिने, १ वर्ष व २ वर्षे कालावधीचे व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यांत येतात. त्यापैकी ६ महिने व १ वर्षाचे काही अभ्यासक्रम हे अर्धवेळ (Part Time) स्वरुपाचे आहेत. यापुर्वी मंडळाचे अभ्यासक्रमास प्रवेश घेतेवेळी मुळ लिव्हिंग सर्टिफिकेट (LC). व मुळ मार्कशिट (Marksheet) देणेचे बंधन नव्हते.

तथापी मंडळाच्या पुर्णवेळ (Full Time) अभ्यासक्रमांस प्रवेश घेतेवेळी बरेच विद्यार्थी एकाचवेळी वेगवेगळया ठिकाणीं पुर्णवेळ अभ्यासक्रमास प्रवेश घेत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे यातुन गैरप्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या अनुषंगाने मंडळ स्तरावर डॉ.र.चं.बाळापुरे प्र.सहसंचालक यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमुन मंडळाचे अभ्यासक्रमास S.S.Code लागू असण्याबाबत तसेच लिव्हिंग सर्टिफिकेट (LC) देणेबाबत समिती स्थापन करण्यांत आलेली होती. सदर समितीने खालील प्रमाणे शिफारस केलेली आहे.

१) सद्यस्थितीत मंडळाचे अभ्यासक्रमांस SS Code लागु नसल्याने लिव्हिंग सर्टीफिकेट निर्गमित करण्याचे अधिकार संस्थांना देता येणार नाही. तथापी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांप्रमाणे पुर्णवेळ सुरु असलेल्या अभ्यासक्रमास प्रवेश देते वेळी मुळ लिव्हिंग सर्टिफिकेट व मुळ मार्कशीट घेण्यात यावी. व अभ्यासक्रम पुर्ण झाल्यानंतर सदर विद्यार्थ्यांना वापस करण्यांत यावी. जेणेकरुन विद्यार्थ्यांना दोन ठिकाणी एकाच वेळी पूर्णवेळ अभ्यासक्रमास प्रवेश घेता येणार नाही व गैरप्रकारांना आळा घालता येईल, असे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

वरील शिफारशीस अनुसरुन मंडळाच्या दिनांक ४ डिसेंबर, २०१४ रोजी झालेल्या ४५ व्या सर्वसाधारण सभेत सदर विषय मान्यतेसाठी ठेवण्यांत आलेला होता. व त्यानुसार सदर सभेने सदर शिफारशीस मान्यता दिलेली आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून प्रवेशासाठी खालील प्रमाणे संस्थांनी कार्यवाही करावयाची आहे.

१) ६ महिने, १ वर्ष व २ वर्षे पुर्णवेळ स्वरुपाचे अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांकडून मुळ लिव्हिंग सर्टिफिकेट (LC) व मुळ मार्कशिट (Marksheet) घेण्यात यावी. व सदर मुळ लिव्हिंग सर्टिफिकेट (LC) व मुळ मार्कशिट (Marksheet) पडताळणीकरीता (Verification) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाकडे प्रवेशाचे यादीसह मंडळाचे प्रवेश कार्यक्रमाप्रमाणे सादर करावी.

२) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी पुर्णवेळ स्वरुपाचे अभ्यासक्रमासाठी मुळ लिव्हिंग सर्टिफिकेट (LC) व मुळ मार्कशिट (Marksheet) घेऊन प्रवेश दिलेले आहेत, याची पडताळणी करुन तसे प्रमाणित करावे.

३) पुर्णवेळ स्वरुपाचे अभ्यासक्रमासाठी मुळ लिव्हिंग सर्टिफिकेट (LC) व मुळ मार्कशिट (Marksheet) नसल्यास प्रवेशास मान्यता देण्यांत येऊ नये.

४) संबंधीत संस्थांनी / विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मुळ लिव्हिंग सर्टिफिकेट (LC) व मुळ मार्कशिट (Marksheet) त्यांना त्यांचे अभ्यासक्रम पुर्ण झाल्यानंतर सदर विद्यार्थ्यांना वापस करण्यांत यावी. तोपर्यंत संस्थांनी त्याचे जतन करावे.

५) मंडळामार्फत मुळ लिव्हिंग सर्टिफिकेट (LC) व मुळ मार्कशिट (Marksheet) याची सदरच्या कालावधीत पडताळणी करण्यांत येईल, याची नोंद घ्यावी.

६) अर्धवेळ (Part Time) असलेल्या अभ्यासक्रमांसाठी मुळ लिव्हिंग सर्टिफिकेट (LC) व मुळ मार्कशिट (Marksheet) याची प्रवेशाचे वेळी आवश्यकता राहणार नाही.

७) मंडळाच्या कुठल्याही अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ATKT लागू राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

संस्थांनी वरील प्रमाणे कार्यवाही करावी.

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी वरील बाबींची काटेकोरपणे अमंलबजावणी करावी. व कुठलेही प्रवेश मुळ लिव्हिंग सर्टिफिकेट (LC) व मुळ मार्कशिट (Marksheet) घेतल्या शिवाय संस्थांमध्ये होणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच सर्व संस्थांना आपल्या स्तरावर तात्काळ कळवावे.

सदरचे पत्र मंडळाचे **www.msbve.gov.in** वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येत आहे.

सदर बाब आपले माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

आपला विश्वासू,

(डी.ए.दळवी)
सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
मुंबई ४०० ०५१.

प्रत :-

१) मा.संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

३) सर्व संस्थांना

४) संगणक विभाग यांना वेबसाईटवर टाकण्याकरीता.